यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे – ९

# नोटीस

दि.२६/११/२०२१

सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि दि. २४ नोव्हेंबर २०२१ च्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे (परिपत्रक क्रमांक २३३८) जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षाच्या प्रवेशास पात्र असतील त्यांनी दि. ३०/११/२०२१ पर्यंत प्रवेश घेण्यात यावा. त्यानंतर आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

A. B. M. S. P.'S Y. C. LAW COLLEGE PUNE-9

SGholap

प्राचार्य

Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

Director,
Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune-411007
Phone No. : 020-25621345/1341/1343
E-mail : coe@unipune.ac.in
bee@pun.unipune.ac.in

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे-४११००७
दूरध्वनी क्र.०२०-२५६२१३४५/१३४१/४३
Website : www.unipune.ac.in

संदर्भ : पमूमं/२०२०-२१/ 2338 दिनांक : 24 नोव्हेंबर, २०२१

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
(पुणे, नाशिक व अहमदनगर जिल्हा)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रथम सत्र परीक्षांच्या आयोजनाबाबत..**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अहित होऊ नये या उद्देशाने सध्या पुढील वर्गात प्रवेशासाठी अर्हता प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांना एक संधी देण्याचे विद्यापीठ अधिकार मंडळाने यापूर्वी निश्चित केलेले होते. सदर बाबीस फक्त या सत्रापुरतीच मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्यास पुढील वर्गात तात्पुरता प्रवेश (प्रोव्हिजनल ॲडमिशन) देणेबावत महाविद्यालयांनी कार्यवाही करावी. अशा विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ च्या परीक्षेत त्यांच्या अनुशेषित (बॅकलॉग) विषयांची परीक्षा द्यावी. या परीक्षेत अनुशेषित विषयांसाठी परीक्षा दिल्यानंतर जर विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात प्रवेशासाठी प्रचलित पध्दतीनुसार अर्हता प्राप्त केल्यास, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१- २२ च्या व्दितीय सत्राच्या परीक्षेचे आवेदनपत्र भरताना, त्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा प्रवेश कायम झालेल्या अभ्यासक्रमाच्या प्रथम व व्दितीय सत्रांच्या परीक्षांचे आवेदनपत्र एकत्रित भरण्याची संधी दिली जाईल व या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होणार नाही.

संबंधित विद्यार्थ्यांना व संलग्नित महाविद्यालयांना या पत्राव्दारे कळविण्यात येत आहे की, अर्हताप्राप्त न झालेल्या अभ्यासक्रमांचे परीक्षा आवेदनपत्र विद्यार्थ्यांना भरता येणार नाही. त्याकरिता विद्यार्थी/संस्थांनी याबाबत मागणी करु नये. तसेच महाविद्यालयांनी असे परीक्षा आवेदनपत्र इनवर्ड करु नयेत. याबाबतीत काही चुका विद्यार्थी अथवा महाविद्यालयांकडून झाल्यास हे प्रकरण प्रमाद समितीसमोर पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयात शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसलेल्या विषयांची निवड केलेली होती. त्यामुळे निकाल प्रक्रिया राबविताना महाविद्यालय व परीक्षा विभागास अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. विद्यार्थ्यांनी योग्य विषय निवडणे आवश्यक राहील व महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र इनवर्ड करतांना याबाबत खातरजमा करणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर फोटोछपाई करण्याची सुविधा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सुरु करणेचे नियोजित आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांचा पासपोर्ट साईज (५१ एमएम X ५१ एमएम) प्लेन व्हाईट बॅकग्राऊंडवरील असा स्वच्छ व उत्तम दर्जाचा असावा. सदर फोटो महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्यांचा आहे याबाबत महाविद्यालयांनी खातरजमा करुन घ्यावी, त्यानंतरच हा फोटो वेबपोर्टलवर अपलोड करावा.

४. जुन्या पॅटर्नमधील २००८/२०१३ पारंपारिक अभ्यासक्रमाच्या अर्हताप्राप्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेश घेतांना २०१९ अभ्यासक्रमानुसार प्रवेश घेणे आवश्यक राहील. त्यासंबंधी समकक्षता अथवा इतर बाबींसंबंधीची माहिती संलग्नित महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावी.

कळावे,

महेश काकडे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ